महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.९०८/एसएम-२ दिनांक:- १८ सप्टेंबर, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,
**अध्यक्ष / सचिव,**
**एस. एस. पी. शिक्षण संस्था,**
**दापोडी, पुणे**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे संचलित गणेश इंटरनॅशनल स्कूल, भूमापन क्र. १५/१/२/३/४/५, दापोडी, पुणे.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.९०८/एसएम-२, दि. ११.११.२०२२.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **गणेश इंटरनॅशनल स्कूल, भूमापन क्र. १५/१/२/३/४/५, दापोडी, पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे संचलित गणेश इंटरनॅशनल स्कूल, भूमापन क्र. १५/१/२/३/४/५, दापोडी, पुणे **(प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तींसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.मुंबई ,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती एसएम-२ (९०८/२१).

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
## MANTRALAY (EXPANSION), ROOM NO. 447,
## MADAM KAMA ROAD, HUTATMA RAJGURU CHOWK, MUMBAI-32

**TEL NO.:-** **Email ID: sm2.sesd-mh@gov.in**

---

No.: SFS-1021/ C.N. 908/ SM-2 Dt. 18th September, 2023

**LETTER OF RECOGNITION**

To,

The President/ Chairman,
S.S.P. Education Society,
Dapodi, Pune.

Subject:- Letter of Recognition for starting new school on the Principle of self-Funded or for improving the grade of the present school under the Maharashtra Self-Funded Schools (Establishment and Regulation) Act, 2012.

Ganesh International School, S. No. 15/1/2/3/4/5, run by S.S.P. Education Society, Dapodi, Pune.

Reference: Letter of Intent No. SFS-1021/C.N.908/SM-2 dt. 11/11/2022.

The S.S.P. Education Society, Dapodi, Pune had presented an application for starting a new school namely Ganesh International School, Survey No. 15/1/2/3/4/5, Dapodi, Pune (Primary to Higher Secondary, Std.1st to Std. 12th, English Medium, C.B.S.E., All Branches) on the principle of self-funded from the academic year 2022-23 under the Maharashtra Self-aided Schools (Establishment and Regulations) Act, 2012.

2. With reference to your Application, a Letter of Intent was given on the terms and conditions for starting the construction of the school on the principle of self-funded to Ganesh International School, S.No. 15/1/2/3/4/5, Dapodi, Pune (Primary to Higher Secondary), Std. 1st to Std. 12th, run by S.S.P. Education Society, Dapodi, Pune under the Maharashtra Self-funded Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and Maharashtra Self-funded Schools (Establishment and Regulation) Rules, 2020, since the academic year 2022-23. Now since the academic year 2023-24, the recognition of starting the said new school, is being given subject to following terms and conditions:-

3. **TERMS AND CONDITIONS**

1) The proposed School, will comply with all the standards, terms and conditions determined by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 and the instructions given by the Government vide this Act or the standards or the Authenticators or terms and conditions given by the Government vide this Act.

TRANSOLUTIONS

2) It is compulsory for the Registered Society or the Trust or the Company to abide by all the standards, terms and conditions determined by the Self-funded Schools (Establishment and Regulations) Act, 2012 or that of the standards and terms and conditions specified by the Government from time to time.

3) For the affiliation of C.B.S.E. or C.I.S.C.E. or C.A.I.E. or I.B. Boards, it is compulsory for the managements of the desirous schools to obtain No Objection Certificate from the Government as per instructions given by the Government from time to time.

4) Before starting the academic year sanctioned by the Government, the School management will inform the Education Officer of the concerned District.

5) A permission given for establishing a new school under the provisions of this Act or for improving the grade of the school, will only be for the year for which the same is sanctioned.

6) If the School Management fails to start the school within 18 months, the recognition letter issued will get cancelled.

7) The medium, place of school sanctioned to the School Management could not be changed in future without the permission of the Government.

8) If the School Management would have established a school at any other place than the place to which sanction is given by the Government, the permission to that school will be cancelled.

9) It has been provided that, the recruitment of teaching and non-teaching staff in the self-funded school, should be made as per prevailing rules and regulations of the Government.

10) At the time of filling the district-wise information, the school to which a permission has been granted, will fill in the information as "self-funded school" as a separate category and will obtain U.D.I.S.E. number. In this regard, the Director of State Project, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared to be the Nodal Officer.

11) The School Management will put a board of "Self-funding Approved School" on the entrance gate of the school area.

12) For the reason of breach of any of the provisions of this Act or Rules made thereunder or for the reason of failure in following the standards or authenticators or terms and conditions specified by the Government from time to time, the State Government can cancel the given Consent Letter at any time.

Sd/-
(Vivek Sapkal)
Work Session Officer, State of Maharashtra

Copy for information to-

1) Commissioner, Education, Maharashtra State, Pune.
2) Director of State Project, Maharashtra Primary Education Council, Mumbai.
3) The Director, (Secondary and Higher Secondary) Maharashtra State, Pune.
4) The Director (Primary), Maharashtra State, Pune.
5) Divisional Dy. Director of Education, Pune Division, Pune.
6) Educational Officer, (Primary/ Secondary), Zilla Parishad, Pune.
7) Selection File SM – 2 (908/21).

TRANSOLUTIONS

TRANSOLUTIONS